I J R S S I S, Issue (VIII), Vol. II, Jan 2023: 245-248
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 517X
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# विसावे शतक आणि दलित चळवळ

एस. पी. राऊत
मराठी विभाग, डॉ. खत्री महाविद्यालय तुकूम, चंद्रपूर
*Corresponding Author :- svarnaraut07949@gmail.com

Communicated : 20.12.2022 | Revision : 12.01.2023 Accepted : 20.01.2023 | Published: 30.01.2023

**सारांश :**
विसावं शतक हे भारत वर्षात स्वातंत्र्याचे शतक म्हणुन ओळखले जावं. हया शतकाचा पूर्वार्ध हा राजकीय स्वातंत्र्याच्या प्रेरणेने प्रेरित झालेल्या संग्रामाचा होता, तर उत्तरार्ध हा सामाजिक स्वातंत्र्यासाठी झालेल्या अनेक चळवळींनी व्यापलेला होता. राजकीय आणि सामाजिक स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या कुशीत विसावं शतक विसावलं होत. जगाला हादरा देणारी महायुद्धे या शतकात झाली.
वर्णव्यवस्था ईश्वर निर्मित आहे असे हिंदू धर्म ग्रंथाचे सुत्र आहे. यालाच आदर्श समाज व्यवस्था म्हणून गौरविले गेले. हिंदू समाजात अतिशूद्राचं, भटक्या विमुक्त जमाती तसेच आदिवासी जमातीत तर वन्य पशु सारखे जीवन जगताना दिसतील. १९शतकात अज्ञानाच्या अंधक:रात पडणारा दलित विसाव्या शतकात आत्मतेजाणे स्वयंप्रकाशित होतो याची कारणे शोधली पाहिजेत. (इस्लामचे आक्रमण, सती प्रथा, बालविवाह, महात्मा ज्योतिराव फुले १९ वे शतक प्रबोधनाचे युग महात्मा गांधी, डॉ. आंबेडकर स्वातंत्र्योत्तर काळ आणि दलित)
पहिल्या अर्धशतकातील दलितांची चळवळ ही आम्ही हिंदू आहोत आम्हाला इतर हिंदू प्रमाणे समान हक्क आणि अधिकार मिळाले पाहिजेत,
**मुख्यशब्द** : समाजव्यवस्था, वर्णव्यवस्था, जातीव्यवस्था, समाजहक्क आणि अधिकार.

**प्रस्तावना :**

दलित चळवळी यावर विचार करताना दलित साहित्याची निर्मितीची अनेक मतमतांतरी दिसतात काही जण बुध्द काळापासून चोखामेळापर्यंततसेच महात्मा फुले आंबेडकर पर्यंत यादुष्टीने पाहतात विसाव्या शतकाला चळवळीच्या इतिहासाचे शतक म्हणता येईल. या शतकातील राजकीय स्वातंऱ्याचा प्रतीक म्हणून महात्मा गांधीजीच्या चळवळीकडे पाहता येईल तर सामाजिक स्वांतञ्याच्या प्रतीक म्हणुन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीकडे पाहता येईल गांधीजींना देश स्वातंञ्य करायचा होता तर बाबसाहेबांना माणूस गांधीजी आणि आंबेडकर हे विसाव्या शतकातील भारताचे मुख्य दोन चेहरे आहेत स्वातंत्र्योतर काळ आणि दलित समाज जगाला हादरा देणारी महायुद्धे या शतकातच झाली.

**मानवधिकार :**

मानवधिकार हा या शतकाचा श्वासोच्छास होता संगणक आणि इंगजी या शतकाची दोन पावल आहेत इंटरनेट उपग्रह आणि फायबर ऑप्टिकलस हया आधूनिक तंत्रज्ञानामुळे ज्ञान आणि महितीचा आधारे जगात फार मोठी क्रांती होत गेली प्राचीन भारतात ज्ञानाची इंटरनेट द्वारे मक्तेदारी एका वर्गाकडे होती जशी जगाला जोडणारी इंटरनेची व्यवस्था जगामध्ये आली तशी माणसाला माणसापासुन तोडणारी अमानुष जाती व्यवस्था ही याच काळात तसेच यापुर्वीच्या शतकातही होती याच्या परिवर्तनाचा विचार मांडताना आपल्याला याचाही विचार करावा लागेल.

अनेक धर्मग्रंथामध्ये जगाला उत्पती विषयी काही वर्णने वाचायला मिळतात हिंदु समाजाने विषमतेच्या आधारावर श्रेणीबद्व चार वर्णात विभागणी केलेली होती यालाच आदर्श समाज व्यवस्था म्हणून गौरवले जात होते हया चतूर वर्णव्यवस्थेत श्रमाची काटेकोर विभागणी करण्यात आली ब्राम्हणांनी आणि ज्ञानार्जन करावे विद्यार्जन करावे क्षत्रीयांनी युद्व करावे देशाचे रक्षण करावे, वैश्यानी व्यापार उद्योग करावा आणि शूद्रानी, त्रेवर्निकांची सेवाचाकरी करावी असे आदेश हिंदु धर्मशास्त्रात दिले आहे यामुळे अस्पृश्यता तसे दलितांना ज्ञान आणि शिक्षण, सत्ता आणि संपती

यापासून जाणीवपूर्वक दूर ठेवण्यात आले,दलिताना माणूस म्हणून जगण्याची मनाई करण्यात आली त्याच्यावर अन्याय अत्याचार होत होते,जन्मताच माणसाला गुन्हेगार ठरवणारी ही व्यवस्था त्याकाळी आपल्याला बघायला मिळते, पण गौतम बुद्वांनी तर हिंदू धर्म व्यवस्थेला प्रचंड हादरा दिला त्याच्या बोध तत्वात सर्व माणसे समान आहेत अशी शिकवण बुद्वांनी दिली.

**चातुरवर्ण व्यवस्था :**

तसेच महानुभाव पंथाचे साहित्य व संत साहित्य अक्षम: म्हणुन गणले जाते चक्रधरानी—म्हटले उतम म्हणजे ब्राम्हण, अधम म्हणजे मातंग ऐसा म्हणे, परी तोही मनुष्य देही आणि निष्पतीकारकची असे: परिवृधा कल्पना करी: महानुभाव पंथानी कर्मठपणा विरुद्व आणि चातुरवर्णाच्या चौकटीविरुध्द बंडाचा पवित्रा घेतला, दलित संत चोखामेळा, बंका महार, सोयराबाई यांनीही आपले अभंगातून आर्तवेदना तीव्रतेने प्रकट केलेली दिसते.

त्यांनतर विसोबा खेचर सावता माळी नरहरी सोनार सेनान्हावी यांनी सुद्वा आपल्या अभंगातुन आपल्या वेदना मांडल्या आहेत, परंतू अस्पृश्यतेविरुद्व लढा दिलेला नाही त्यानंतर हिंदुच्या स्थानावर अनेक परकीय हल्ले झाले, इंग्रजांनी सर्वप्रथम हिंदूंची वर्ण व्यवस्था नाकारली आणि जात पंचायतीचे अधिकार धुडकावुन लावले ठीक—ठिकाणी चर्च स्थापन केले. अनेक दलितांनी अस्पृशानी धर्मातर करुन ख्रिस्ती धर्म स्वीकारला. दलित सैनिकांच्या कार्यक्रमाची कदर करुन शुर दलित सैनिकांच्या स्मरणार्थ इंग्रजांनी कोरेगाव येथे विजयस्तंभ उभरला सन १९८८ ला किसन भागू बदसोडे यांनी अस्पृश्यांच्या प्रश्नाविषयी जागरुकता निर्माण केली आणि अस्पृश्यांच्या वतीने संघर्ष केला १९०३ मध्ये पुणे जिल्हातील सासवड येथे ५१ गावाच्या महाराची सभा बोलावली होती आपल्या हक्कासाठी अस्पृश्यानी केलेला हा पहिला संघटित सनदशीर प्रयत्न होता.

**सुधारकांची चळवळ :**

शतके अज्ञानाच्या अंध:करात चाचपडणारा दलित विसाव्या शतकात आत्मतेजाने स्वयंप्रकाशित होतो याची कारणे शोधली पाहिजेत. त्याशिवाय परिवर्तनाच्या चळवळीचा मुळ आधार गवसणार नाही म्हणुनच लक्ष्मण शास्त्री जोशी यांनी म्हटले आहे '१९ व्या शतकापर्यत दलित आत्मप्रकाश हरवुन बसला होता. विसाव्या शतकात आत्मतेजाने स्वयंप्रकाशित होतो' इस्लामाच्या आक्रमणानंतर जशी संतांची चळवळ उदयास आली त्याप्रमाणे ब्रिटिशांच्या आगमनानंतर सुधारकांची चळवळ उदयास आली राजाराम मोहन राय यांना स्त्री सुधारण्याचे जनक मानले जाते त्यांनी सतीच्या चालीविरुद्व पहिला आवाज उठवला तसेच विधवा विवाह विषयीचेही समर्थन केले.रॉय यांच्या चळवळीमुळे इंग्रजानी१८२९ साली कायद्याने सतीची चाल बंद केली महात्मा ज्योतिराम फुले हे कृतिशील विचारवत आणि बंडखोर समाज सुधारक होते तसेच स्त्री शुद्रातीशुद्राच्या व्यथा—वेदनाना वाचा फोडली १९ व २० वे शतक प्रबोधनाची युग होते. स्वातज्यापुर्वी स्वातज्यसैनिक ब्रिटिशाविरुद्व लढत होते तर समाजसुधारक प्रथाविरुद्व,महात्मा गांधीनी अस्पृश्यता निवारन्याच्या कार्याला महत्वाचे मानुन १९३२ मध्ये 'हरिजन सेवक संघ' स्थापन केला शिक्षण संस्था मंदिरे पानवटे व इतर सार्वजनिक ठिकाणी अस्पृश्यांना प्रवेश मिळाला पाहिजे एवढेच प्रतिपादन केले गेले म्हणुनच भाई माधवराव बागल यांनी आपल्या भाषणात म्हटले आहे 'गांधीनी अस्पृश्यांच्या वस्तीत जाउन राहिले पण अस्पृश्यांच्या जीवनाशी आणि महत्वाकांक्षेशी समरस होउ शकले नाहीत.' संत चोखामेळापासून तर गोपाल बाबा बलंग कर आणि संत गाडगे महाराज बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य आणि विचार

क्रांतिकारक वाटतात, आंबेडकराचा सत्याग्रह केवळ मंदिर प्रवेशासाठी होता असे नव्हे तर आम्ही हिंदू आहोत आम्हाला इतर हिंदू प्रमाणे जगायचे असे त्यांचे मत होते. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांच्या इतिहासातील एक पुरुष आहेत धम्म आणि कायदे निती त्यांच्या चळवळी आणि मागण्यातुन स्वातंत्रोतर काळात दलित चळवळ आणि दलित साहित्य यांचा जन्म झाला १५ ऑगस्ट,१९४७ नंतर म्हणजे स्वातंत्रोतर काळातील वास्तव अतिशय विदारक होते दुस—या महायुद्वाच्या पर दुष्परिणांनी संपुर्ण जग होरपडत होते आपल्या आपल्या देशातील माणूस हादरुन गेला होता त्या पाठोपाठ गांधींजीच्या हत्येमुळे खेडयापाडयात दंगली उसळलया त्यामुळे जातीय तणावात तणावाला खतपाणी मिळाले.

स्वातंत्र्यानंतर: स्वातंत्र्य मिळाल्यामुळे सर्व प्रश्न मार्गी लागतील असे वाटू लागले. आंबेडकरांच्या प्रेरणेमुळे स्वातंत्र्यत्तर काळातील दलित चळचळ उभी राहिली लाखो अनुयायीसोबत १४ ऑक्टोबर १९५६ रोजी बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि १७ डिंसेबर १९५६ मध्ये त्यांचे निधन झाले डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे इतिहासातील एक योगपर्व आहे. त्यांच्या निधनानंतर दलित समाजात एक प्रचंड पोकळी निर्माण झाली. त्यानंतर काही मते— मतांतरे दलित समाजाचे नेतत्व काहींना वाटत होते की आंबेडकर कुटुंबातील व्यक्तींना द्यावे काहीना ते मान्य शेवटी 'सामुहिक नेतत्वाची' कल्पना पुढे आली. त्यानंतर 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाची स्थापना झाली. रिपब्लिकन पक्षाने भारतातील सर्व दुर्बल घटकांना अलपभूधारकांना,भूमिहिन मजुरांना श्रमिकांना, अलपसंख्याकांना संघटित करुन त्यांना सामाजिक आणि आर्थिक न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. १९६४च्या भूमिहिनांच्या सत्याग्रहाला अधिक महत्व दिले जाते. त्याप्रमाणे भूमिहीनांच्या प्रश्नाबरोबर बौद्धांना सवलती मिळालया पाहिजेत दलितांना दीक्षाभूमीची जागा मिळाली पाहिजे. अस्पृश्यता निवारण कायाची कडक अंमलबजावणी करावी आणि लोकसभेच्या केंद्रीय सभागहात बाबासाहेब आंबेडकरांचे तैल चित्र लावावे अशा मागणीसाठी वेळोवेळी चळवळी होत गेल्या. १९८४मध्ये प्रकाश आंबेडकर यांनी दलित जनतेला स्वत:चे नेतृत्वाखाली आणण्याचा प्रयत्न केला त्यानंतर केंद्रात जनता दलाचे सरकार आले व पंतप्रधान विश्वनाथ प्रताप सिंग यांनी संसदेला संसदेच्या केंद्रीय सभागृहात बाबासाहेब आंबेडकरांची प्रतिमा लावली होती त्यानंतर आंबेडकरांना मरणोत्तर 'भारतरत्न' पदवी प्राप्त करणे प्रदान करण्यात आली. आंबेडकरांच्या कार्यकाळाला दलित चळवळीच्य इतिहासातील 'प्रबोधनपर्व' म्हणता येईल.

दलित चळवळीच्या विकासासाठी दलित लेखकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले, बाबुराव बागुल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली' हा कथासंग्रह, नामदेव ढसाळ यांचा 'गोलपिठा' हा काव्यसंग्रह, दया पवार, लक्ष्मण गायकवाड यांची आत्मचरित्रे, नामदेव कांबळे यांची 'राघववेळ' हया कादंबऱ्या म्हणजे तरी साहित्यातील सौंदर्य स्थळे आहेत. मराठवाडयासारख्या मागासलेल्या प्रदेशात उच्च शिक्षणाची अधिक निकड आहे हे जाणुन आंबेडकरांनी औरंगाबाद येथे 'मिलिंद महाविालयाची' स्थापना केली त्यानंतर मराठवाडा विापीठाला बाबासाहेबांचे नाव ावे म्हणुन भारतीय दलितांनी प्रदिर्घ लढा दिला १९७६ ते १९९४ हया काळात दलित पॅंथरने आपली मागणी लोकांपुढे मांडली. अखेर १४ जानेवारी १९९४ ला रोजी महाराष्ट्र श्शासनाने मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार केला त्यानंतर सन १९७७ पासून कांशीराम यांनी महाराष्टातील दलित चळवळीचे नेतृत्व करण्याचे प्रयत्न केले. महाराष्ट वगळता दक्षिण भारतातील दलितांना गुलाम बनवले आहे. दलित स्त्री ही

तर गुलामाची गुलाम आहे दलित लेखकांनी दलित चळवळीसाठी महत्वाचे लेखन केले विसाव्या श्शतकावर बाबासाहेबांचा प्रभाव दिसुन येतो इथल्या धर्मा देवयांनी माणसाची आरती कधी मनापासून म्हटलेली नाही त्यांनी माणसावरील विश्वास कधी व्यक्त केला नाही असे रा. ग. जाधव यांनी म्हटले आहे.

**समारोप** : अशाप्रकारे विसाव्या आणि एकविसाव्या श्शतकाच्या काळात दलितांच्या राजकिय पक्ष दुफळीने दुर्बल झाला आहे. दलितांच्या दलित साहित्याला दलित साहित्य म्हणावे, बौद्व साहित्य म्हणावे, प्रबुद्ध साहित्य म्हणावे, परिवर्तनादी साहित्य म्हणावे की आंबेडकरवादी साहित्य' हया गोंधळलेल्या मानसिक ते मध्ये दलित लेखक हरवला आहे.

**निष्कर्ष** : —

१. आपल्या बदलाच्या काळातही 'जात' माग जात नाही. उलट सवलतीमुळे एक नवा वर्ग दलितांमध्ये निर्माण होत असल्याचे दिसते.

२.प्राचिन साहित्यापासून तर अगदी दलित ग्रामिण साहित्याच्या प्रवाहापर्यत सर्वग सारखाच संचार आहे.३. विसाव्या शतकावर बाबांसाहेबांचा प्रभाव दिसून येतो.

४. एकंदरीत दलित साहिल्याला उपकारक ठरेला अशाप्रकारे विचार आलेले आहेत.

**संदर्भ** :

डॉ. रविंद्र मुरमाडे — आंबेडकरी तत्वज्ञानाची स्वंयप्रकाशित कविता : त्र्यबंक सपकाळे, ततैव : पुष्ठ क्र २२

आनंद यादव—१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाहस्वातञ्योतर समाज पुष्ठ क्र १११तमैव साहित्य चळवळी पुष्ठ क्र १५३

डॉ. मदन कुलकर्णी : गौरवगंथ — साहित्य गामिण आणि दलित विजय प्रकाशन नागपुर पुष्ठ क्र पहिली आवृती ५ सप्टेबर ,२०२२

ततैव : पुष्ठ क्र १८०

ततैव : पुष्ठ क्र १९३